# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - १२ एप्रिल २०२४

---

जळगाव दि.१२ (प्रतिनीधी) : संविधानाला प्रमाण मानून सामाजिक दायित्वाच्या भावनेतून प्रशासनात काम करता येते मात्र त्यासाठी निष्कलंक चारित्र्य हवे असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी ई.झेड. खोब्रागडे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात दि. १२ ते १४ एप्रिल या कालावधीत महात्मा फुले-डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव आयोजित करण्यात आला असून खोब्रागडे यांचे शुक्रवारी “फुले-आंबेडकरी विचार प्रवाहातील जाणकारांचे सामाजिक दायित्व” या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे होते. यावेळी मंचावर प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ. विनादे पाटील, विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.म.सु.पगारे, व्यवस्थापन परिषद सदस्य तथा म.फुले अध्ययन व संशोधन केंद्राच्या प्रमुख डॉ.पवित्रा पाटील, महोत्सवाचे समन्वयक डॉ. राकेश रामटेके, मागासवर्गीय संघटनेचे अध्यक्ष विकास बिऱ्हाडे उपस्थित होते.

इ.झेड. खोब्रागडे यांनी आपल्या भाषणात प्रशासनात सनदी अधिकारी म्हणून काम करतांना महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, शाहु महाराज आदी महापुरषांचे सामाजिक दायित्वाचे विचार घेऊन कसे काम केले याची माहिती दिली. दायित्वाची भावना आंतरिक असते. वडीलांनी या भावनेतून सनदी अधिकारी व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली आणि ओएनजीसी मधील नोकरी सोडून स्पर्धा परीक्षेद्वारे प्रशासनात आलो असे ते म्हणाले. सामान्य माणसाचे काम वेळेच्या आत करावे. प्रशासनात कुठे हो म्हणावे आणि कुठे नकार द्यावा हे शिकले पाहिजे असे सांगून खोब्रागडे म्हणाले की संविधानाच्या नितीमुल्यांचा अंगीकार करणे आणि तसे वागणे म्हणजे फुले-आंबेडकरी विचार पुढे नेणे होय. प्रश्न विचारण्याची ताकद संविधानाने दिली आहे. त्यामुळे सतत प्रश्न विचारले पाहिजे. सचोटी,बुध्दीमत्ता आणि निष्कलंक चारित्र्य महत्वाचे असल्याचे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात राजेंद्र नन्नवरे यांनी राष्ट्रभक्ती, जाती निर्मुलन, महिलांचा सन्मान, पर्यावरण, सार्वजनिक शिस्त हे गुण सामाजिक दायित्वात महत्वाचे असल्याचे सांगितले. प्रारंभी प्रा.म.सु.पगारे यांनी प्रास्ताविकात महोत्सवाची भुमिका सांगितली. प्रा.रमेश सरदार यांनी

पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.दीपक खरात यांनी केले. डॉ. पवित्रा पाटील यांनी आभार मानले. उद्या शनिवार दि. १३ एप्रिल रोजी रक्तदान शिबीर आणि त्यानंतर डॉ.घन:श्याम थोरात यांचा प्रबोधनपर गीतगायन कार्यक्रम होणार आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.सुनील पाटील

जनसंपर्क अधिकारी